क्रमांकः-मुद्रांक-२०१४/२०७०/प्र.क्र.३०८/म-१
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक:- २ ऑगस्ट, २०१४

प्रति,

१) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे,
२) सह नोंदणी महानिरीक्षक व सह मुद्रांक नियंत्रक, पुणे.
३) श्री. विमल शहा, अध्यक्ष, MCHI, मुंबई
४) श्री. एस.एस.हुसेन, मुख्य कार्यकारी अधिकारी (MCHI), मुंबई.

विषयः- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा करण्याबाबत
दि.२२/०७/२०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त...

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आदेशावरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा करण्याबाबत मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्येक्षतेखाली, अध्यक्ष, MCHI यांच्या समवेत, दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमधील मुद्दे व त्यावरील निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्या | निर्णय |
|---|---|---|
| १. | स्थावर मालमत्तेच्या संदर्भातील विकसनाच्या अनुषगांने होणा-या विकसन किंवा जॉईट व्हेचंर करार या स्वरुपाच्या करारनाम्यास १% मुद्रांक शुल्क आकारण्याची मागणी. | याबाबत चर्चा होऊन MCHI यांनी प्रस्तुत विषयाबाबत स्वयंस्पष्ट निवेदन द्यावे व त्यावर नोंदणी महानिरीक्षक यांचे अभिप्राय घेण्यात येऊन कार्यवाही करण्यात यावी. |
| २. | भागीदारी संस्थेचे मर्यादीत कंपनीमध्ये रुपांतर होत असल्यास, अशा संलेखास जास्तीत जास्त रुपये १००/- इतके मुद्रांक शुल्क आकारण्याची मागणी. | याबाबत चर्चा होऊन MCHI यांनी स्वयंस्पष्ट निवेदन द्यावे व त्यावर नोंदणी महानिरीक्षक व विधी व न्याय विभाग यांचे अभिप्राय घेण्यात येऊन निर्णय घेण्यात यावा. |
| ३. | जंगम व स्थावर मालमत्ते संदर्भातील हक्कलेख- निक्षेप, हडप, तारण किंवा तारण गहाण या सारख्या संलेखावरील मुद्रांक शुल्काची रुपये १०,००,०००/- इतकी मर्यादा करणे आवश्यक आहे. | कार्यवाही पुर्ण. जंगम मालमत्तेच्या अनुषंगाने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा करण्यात आली असून त्याची अमंलबजावणी दि. ०१ जुलै, २०१४ पासून करण्यात आली आहे. |
| ४. | कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा पुर्नरचनेच्या बाबतीतील उच्च न्यायालयाच्या आदेशा संबंधित संलेखास जास्तीत जास्त रुपये १०,००,०००/- इतकी मर्यादीत करणे आवश्यक आहे. | MCHI यांनी कंपनी एकत्रीकरणाबाबत इतर राज्यातील मुद्रांक शुल्काच्या दरांची माहिती संकलित करुन शासनास निवेदन द्यावे. तसेच नोंदणी महानिरीक्षक यांनी सुध्दा माहिती संकलित करावी. |

| | | |
|---|---|---|
| ५. | महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१ (१९७१ चा महा. २८) अन्वये झोपडपट्टी घोषीत जमीनीच्या खरेदीखत व विकसन करारनामा या संलेखास रु. १००/- चे मुद्रांक शुल्क देय असणे आवश्यक आहे. | या प्रस्तावाच्या अनुषंगाने गृहनिर्माण विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले असून ते अद्याप अप्राप्त असल्याने त्याचा पाठपुरावा करण्यात यावा. |
| ६. | इमारतीच्या आराखड्यास मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर जमिनी आपोआप बिगरशेती होण्याबाबत. | कार्यवाही पुर्ण. याबाबत महसूल विभागामार्फत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. |

(ज्योत्स्ना मु. माडेकर)
कक्ष अधिकारी

प्रत,

प्रधान सचिव, (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

उपसचिव, महसूल व वन विभाग (का.म-१/मुद्रांक) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.